# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## लेखा विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय – प्र.क्र.०६ मध्ये आईस फॅक्टरी रस्त्यावरील घर नं.१८३३ जवळ सी.सी गटार बांधणे. या कामाकरीता प्रभाग निधी या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त साो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि.२३/१२/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम (रक्कम लाखात) | दि. २३/१२/२०२४ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग निधी | रु. ०.०० लक्ष | रु. ०.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | |
| | एकूण | रु. ०.०० लक्ष | रु. ०.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | |

महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सन २०१६-१७ पासून कॅश फ्लो उपलब्ध नसल्याने प्रलंबित देयकांकरीता निधी तरतूद करणेत आलेली नव्हती. त्यामुळे प्रभाग निधी या लेखाशिर्षामधून विकास कामे करावयाची नसल्याने या लेखा शिर्षामध्ये काही वर्षापासनू तरतूद केल्याचे दिसून येत नाही. खालील काम हे प्रलंबीत देयकामधील असून प्रभाग निधी या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात प्रस्तावित केलेले होते. सदर कामाचे रु.३,९८,८९७/- इतक्या रक्कमेचे देयक आहे. ठेकेदार यांना देयक अदा करणेकामी निधी नसल्याने मा.आयुक्त साो. यांनी दिनांक २०/१२/२०२४ रोजी पुनर्विनियोजन करून निधी उपलब्ध करुन देयक अदा करणेबाबत मान्यता दिलेली आहे. पुनर्विनियोजनाकरीता लागणारा निधी बांधकाम विभागाकडून घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने खालील कामाकरीता बांधकाम विभागाकडील "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधुन रु. ४.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|
| प्र.क्र.०६ मध्ये आईस फॅक्टरी रस्त्यावरील घर नं.१८३३ जवळ सी.सी गटार बांधणे. | रु. ३,९९,३९५/- | |
| एकूण | रु. ३,९९,३९५/- | |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि. २३/१२/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. २३/१२/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात) | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| | स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा | रु.१००.०० लक्ष | रु.४३.९९ लक्ष | रु.५६.०१ लक्ष | रु.४.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा◌ो. यांच्याकडे निहीत आहेत.

प्र.क्र.०६ मध्ये आईस फॅक्टरी रस्त्यावरील घर नं.१८३३ जवळ सी.सी गटार बांधणे बाबत. विषयांकित कामाचे देयक अदाकरावयाचे असून निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे पुनर्विनियोजन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त सा◌ो. यांनी पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव तयार करणेस दि.२०/१२/२०२४ रोजी मान्यता दिलेले आहेत. त्या अनुषंगाने प्रभाग निधी या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षामधून रु.४.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक ~~२०/१२/२०२४~~ 06/01/2025 रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. 420 दिनांक १६/१/२०२५

प्र.क्र.०६ मध्ये आईस फॅक्टरी रस्त्यावरील घर नं.१८३३ जवळ सी.सी गटार बांधणे बाबत. विषयांकित कामाचे देयक ठेकेदार यांना अदा करावयाचे असून निधी अभावी प्रलंबित आहे. प्रभाग निधी या लेखाशिर्षामध्ये निधी नाही. सदर लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणे गरजेचे आहे. तरी प्रभाग निधी या लेखाशिर्षामध्ये "स्ट्रक्चरल ऑडीट व इमारतीची सुधारणा" या लेखाशिर्षामधून एकूण रु.४.०० लक्ष निधीचे पुनर्विनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका